राज्य राखीव पोलीस बल इतर राज्यात प्रतिनियुक्तीवर पाठविण्याचे अधिकार प्रदान करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन परिपत्र क्र.एसआरपी-०१०५/प्र.क्र.१५/विशा-१-अ
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक : [illegible]-सप्टेंबर, २००६.

परिपत्रक :- निवडणूक बंदोबस्त वा सण/उत्सव सारख्या महत्वाच्या प्रसंगी इतर राज्यांकडून राज्य राखीव पोलीस बलाची मागणी केली जाते. अशा वेळी राज्यातील कायदा व सुव्यवस्थेबाबत पोलीस महासंचालकांचे अभिप्राय घेऊन त्यांच्या शिफारशीनुसार शासनाच्या मान्यतेने राज्य राखीव पोलीस बलाच्या तुकडया प्रतिनियुक्तीवर पाठविल्या जातात. परंतु ही प्रक्रिया पार पाडून अल्प कालावधीमध्ये राज्य राखीव पोलीस बलाच्या सेवा प्रतिनियुक्तीवर पाठविण्यास विलंब होतो. सदर होणारा विलंब टाळण्यासाठी यापुढे सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांना राज्य राखीव पोलीस बल इतर राज्यात प्रतिनियुक्तीवर पाठविण्यास मंजूरी देण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्र. भि. चव्हाण)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) अपर मुख्य सचिव (गृह), मंत्रालय, मुंबई,
२) प्रधान सचिव (अपील व सुरक्षा), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
३) प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
५) पोलीस उप महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
६) निवड नस्ती/विशा-१-अ.

[illegible]